Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

सोलापूर जिल्ह्यातील लोकदैवत पितृदैवतांची परंपरा

प्रा.मधुकर श्रीरंग पवार
विभाग प्रमुख (मराठी विभाग)
छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज,सोलापूर.

प्रास्ताविक :-

लोकदैवत किंवा ग्रामदैवत ही दैवते व्यक्तिनिष्ठ नसतात तर त्या समूहनिष्ठ असतात. त्यामुळे उपासना, उत्सव हा समूहपूरक असतो. म्हणून त्याला लोकरंजनाचे स्वरूप प्राप्त होते. ही दैवते जाती-धर्मांच्या, पंथांच्या पुढे जाऊन सर्वच मानव जातीची झाली. एके काळी इस्लाम धर्माचा, दर्गाह, पीर, ईदगाह, गड अशी तीर्थक्षेत्र होती.आज ती हिंदूंची झाली आहेत, आणि हिंदूंचे पांडुरंगाचे मंदिर, सिध्दरामेश्वरांचे मंदिर अशी दैवते मुस्लिमां-साठी उघडी आहेत. याचाच अर्थ ही लोकदैवते जाती-धर्मांशी निगडीत न राहता लोक जीवनाशी बांधली गेली आहेत. लोकसंस्कृतीची क्षितीजे या ग्रंथात रा. चि. ढेरे म्हणतात,'सर्वसाधारण भारतीय जनता अति प्राचीन काळापासून यक्षाच्या उपासनेत रंगलेली दिसते.आजही भारतातील खेड्या-पाड्यात यक्षोपासनेचे शेकडो अवशेष विखुर लेले पाहायला मिळतात'

उदा.अहमदनगर जिल्ह्यात पाथर्डी तालुक्यात नांदुर गावात निंबा- दैत्याची पूजा केली जाते. नांदुर गावात गुढी पाडव्याच्या शुभ मुहुर्तावर या पंचक्रोशीत लोक आपल्या निंबादैत्य ग्रामदैवतांची पूजा करतात. सर्व जाती-धर्मांचे लोक निंबादैत्याची श्रध्दापूर्वक उपासना करतात. हा दैवत नवसाला पावतो, यांच्या साक्षीने कोणेत्याही शुभ कार्याला प्रारंभ होतो. लोकांना देव आणि दानव सारखेच वाटतात, की जे भक्तांच्या संकट समयी धावून येतात, लोकांच्या इच्छा, आकांक्षाची पूर्तता करतात. अशा सर्वांचीच लोक पूजा करतात. अशा दैवतांची उपासना करतात. हे या वरुन लक्षात येते.

आत्मा अमर आहे, शरीर नष्ट हाते. पण आत्मा अनश्वर आहे, आत्मा परमात्म्याचा अंश आहे.त्यामुळे अनेक पिढ्यात एक नाव पुढे चालविण्याची प्रथा रूढ झाली.आजोबांचे नाव पुढे नातवाला मिळते. पितृदेवतांचा सुध्दा याच्याशी संबंध आहे. पारंपरिक दैवतांच्या विधी करीत असताना पितृ परंपरा विचारली जाते. वासुदेव दान पावलं मागायला आल्याबरोबर पूर्वजांच्या नावाचा उध्दार करतो. म्हणून पितृदैवत आणि मातृदैवत यांचा जवळचा संबंध आहे. लग्नानंतर घरात गोंधळ घालण्याची जुनीच प्रथा आहे, त्यावेळी मातृदैवतांना आवाहन केले जाते. त्यांना ही या गोंधळाला येण्यासाठी गोंधळी लोक आवाहन करत असल्याचे आढळते.

महाराष्ट्रातल्या बहुतेक क्षेत्रपाल दैवतांचे स्वरूप खेड्यातल्या साध्या भोळ्या भक्ताप्रमाणेच साधे भोळे असते. त्यांची नावे सुध्दा म्हसोबा, खंडोबा, ज्योतिबा, मल्हारी, मार्तंड, वेताळ, भैरोबा अशा स्वरूपात नावे असतात. मातृदैवता प्रमाणेच पितृदैवतांनाही पशू बळी देण्याची प्रथा रूढ झाली. या क्षेत्रपाल दैवतांची निर्मिती मातृदैवतांच्या नंतर असावी असे त्यांच्या स्वरूपावरून जाणवते. 'जेजुरीचा खंडोबा, वाडी रत्नागिरीचा ज्योतिबा अशी जेंव्हा विशिष्ट स्थानाशी

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

जोडून ही नावे येतात. तेंव्हा क्षेत्र या गोष्टीची त्यांचा जवळचा संबंध असावा ही गोष्ट नाकारता येत नाही. या पितृदैवतांशी संबंधित असणाऱ्या गोष्टींचा विचार करता येईल'

जोकमारपूजा ही पितृदेवता पूजाच आहे, या पितृदैवतांची पूजा स्त्रियाच करतात. कर्नाटकात कुंभाराच्या स्त्रिया जोकमार मूर्त्या बनवितात, या पितृदैवतांची पूजा पुत्र प्राप्तीची आशा ठेवून केली जाते. शंकराच्या लिंगपूजा बरोबर नंदीची पूजा केली जाते. ज्योतिबा, खंडोबा बरोबर कुत्रा असतो, अशा दैवतांनी नंदी, घोडा, कुत्रा या प्राण्यांचा स्वीकार यासाठीच केला असावा असे वाटते. म्हस्कोबा एक क्षेत्रपाल देवताच आहे, यमाईचा ज्योतिबा, सांजेरीचा रवळनाथ, म्हाळसेचा खंडोबा, जोगेश्वरीचा भैरवरूप म्हस्कोबा या महाराष्ट्रातील प्रमुख क्षेत्रपाल पितृदेवताच आहेत. पुरंदर तालुक्यात वीर यागावी म्हस्कोबाचे मंदिर आहे, हा धनगरांचा देव आहे. धनगरांच्या देवाचे नाव बीरबो (वीर + बा) असा संबंध असावा. धनगर जातींच्या लोकांना वाटते, म्हस्कोबा सोनारीचा भैरव आहे.

सोलापूर जिल्ह्यात प्रत्येक गाव-वाडीवर लोकदैवतांचे ठाणे आहे, त्यात पितृदैवतांची तीर्थ अनेक ठिकाणी आहेत. सोलापूर जिल्ह्यात एकूण अकरा तालुके आहेत विशेषतः सगळ्याच तालुक्यात पितृदैवतांची मंदिरे आहेत. पण येथे प्रमुख ठिकाणच्याच दैवतांचा विचार केला आहे. सोलापूर जिल्हा दक्षिण देशातील कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या राज्यांना जोडला गेलेला जिल्हा आहे.

सोलापूर शहरापासून ७५ किलोमीटर पंढरपूर हे अध्यात्मिक क्षेत्र आहे. मराठी, कानडी व इतर कांही लोकधर्मीचे पंढरपूर हे महत्त्वाचे केंद्र आहे. पंढरपूर शहरात व तालुक्यात मोठ्या प्रमाणात पितृदैवतांची मंदिरे आहेत.पंढरपूर हे शहर भीमा नदीच्या काठावर वसलेले आहे. या तीर्थक्षेत्रात भीमा नदीला चंद्रभागा असे म्हणतात, भक्त पुंडलिकाची साधना भंग करण्यासाठी धावत आलेली भीमा नदी भक्त पुंडलिकाची अविरत आई-वडीलांची सेवेची तपश्चर्या पाहून, शहराला वळसा घालून पुढे पुढे जात असता अर्धचंद्राकृती असा आकाराने धावते, म्हणून भीमेला चंद्रभागा असे नाव पडले.

दक्षिण भारतातील साध्या भोळ्या माणसांचे श्रध्दास्थान असलेले, सर्वत्र प्रसिध्दअसलेले तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूर या नगरीचा उल्लेख करावा लागतो. पंढरीचा विठ्ठल हा पूज्य असा पितृदेव आहे. हे प्राचीन देवस्थान आहे, 'या नगरीला पंढरपूर, पंढरी, पांडुरंगपूर, पंढरीपूर, फागनीपूर, पौंडरिक क्षेत्र, पंडरंग व पांडुरंग पल्ली अशी विविध नांवे आहेत. संतजन या क्षेत्राचा भूवैकुंठ किंवा दक्षिण काशी म्हणून उल्लेख करतात' तालुक्याला कर्नाटक राज्याला लागून असलेले हुलजंती हे गाव धनगरांची लोकदेवता महालिंगराया या देवासाठी प्रसिध्द आहे. महालिंगराया हे मूळ बारामतीचे, त्यांचा जन्म बारामतीला झाला, त्यांचा सांभाळ चुलत्यांनी केला. महाप्पा, जकाप्पा हे दोन भाऊ चुलत्याकडे राहून, लहानाचे मोठे झाले. महाप्पा म्हणजे महालिंगराया यांची उम्रजला धनगरांचा देव बिरोबा यांची भेट झाली आणि त्या प्रसंगापासून महालिंगराया बिरोबा देवाच्या सेवेत राहू लागले.हुलजंतीच्या महालिंगरायाची आणि हुन्नरच्या बिरोबाची भेट हा गुरू-शिष्याच्या भेटीचा अद्वितीय असा सोहळा पाहण्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशातून धनगर समाजाचे लोक या ठिकाणी येतात, प्रचंड अशी गर्दी होते. भेटीचा सोहळा संपन्न झाल्यावर, दोन ते तीन ट्रक भंडारा गोळा केला जातो'[१०] दरवर्षी धनगर समाज या लोकदैवतांच्या सोहळ्यासाठी हजेरी लावतो. तसेच या हुलजंतीला विरभद्र देवाचे छोटे मंदिर आहे. 'देवाची अक्षय तृतीयेला यात्रा भरते, या यात्रेच्या निमित्ताने वेगवेगळे विधी पार पाडल्या जातात. महादेवाच्या जटातून या विरभद्र देवाचा जन्म झाला'[११] अशी कथा या मंदिराचे पुजारी बसय्या रेवणसिध्दय्या स्वामी यांनी सांगितली.

सिध्दापूर श्री. मातुर्लिंग गणपती हे सिध्दापूरच्या लोकांचे लोकदैवत आहे. या गावी अनेक सिध्दपुरूष येऊन गेल्यामुळेच या गावाला सिध्दापूर नाव प्राप्त झाले असे म्हटले जाते. गोगांव या गावी श्री. कल्लेश्वरांचे प्राचीन मंदिर आहे. पितळेच्या धातूपासून बनविलेला देवाचा मुखवटा आहे असे सांगितले जाते. रामानी रावणाचा वध केला,रावण हा शिवभक्त होता, त्याचे पाप रामाला लागू नये म्हणून वशिष्ट ऋषींनी रामाला १०८ लिंग स्थापन करून गो-दान करण्यास सांगितले.अक्कलकोट तालुक्यात गोगांव गो-म्हणजे गाय.रामांनी या गावात कल्लेश्वरांचे लिंग स्थापन करून गाई भक्तांना दान केल्या म्हणून या गावाला गोगांव असे नांव पडले असावे चपळगांव येथे मल्लिकार्जून हे लोकांचे

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

ग्रामदैवत आहे. श्री. मल्लिकार्जूनांचे जुने हेमाडपंथी शैलीचे मंदिर आहे. चैत्र शुध्द एकादशीला सूर्याची किरणे मंदिरातील थेट महादेवाच्या पिंडीवर पडतात आणि या ग्रामदैवताच्या यात्रेला प्रारंभ होतो. हैद्रा महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या सीमेवर असलेले हैद्रा हे गाव हजरत ख्वाजा सैफन मुलक यांच्या दर्ग्यासाठी प्रसिध्द आहे. हे मंदिर हिंदु आणि मुस्लीम यांच्या भक्तीचे प्रतिक आहे. या मंदिरात सर्व जातीधर्माचे लोक येतात. फार पूर्वीपासून हा दर्गा लोकाचे श्रध्दास्थान आहे. या ठिकाणी सर्व धर्माचे ऐक्य पाहायला मिळते. राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक असणाऱ्या या तीर्थक्षेत्राचा विकास झाल्यास जातीय व धार्मिक सलोख्याचे नाते प्रस्थापित होईल.

रुई सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्यात भीमानदीच्या पात्रात रुई येथे मसोबा देवाची स्वयंभू मूर्ती आहे. या मसोबाची मूर्ती दिसायला सुंदर आहे. या देवताची यात्रा वर्षातील चैत्र महिन्यात व श्रावणात होते.आठवड्यात फक्त शनिवार सोडून इतर कोण्त्याही दिवशी मसोबाच्या दर्शनासाठी लोक येतात. अमावस्याला भाविक मोठ्या श्रध्देने या दैवताला नवस बोलतात.त्यांच्या नवसाला पावणारा देव म्हणून या मसोबाची लोकप्रियता आहे. 'महाराष्ट्रात प्रत्येक गावाच्या शिवेवर आणि शेताच्या बांधावर याचे ठाणे असते. गावात रोगराई उत्पन्न झाली तर याला कोंबडी, बकरी, नारळ इत्यादी वस्तु अर्पण करतात'

पोखरापूर हे मोहोळ तालुक्यातील महत्त्वाचे गाव आहे. या गावात विठ्ठल-बीरदेवाचे ठाणे आहे. हे ठाणे 'धनजी-विठोबा' या नावाने ओळखले जाते. या गावात विठ्ठल-बिरोबा देवाची जुने आणि नवे अशी दोन ठाणी आहेत. जुने स्थान पोखरापूरच्या दक्षिणेस आहे. गावापासून दीड-दोन मैलावर एका माळावर आहे. या माळाला 'दंडीचा माळ' असे म्हणतात. नवे मंदिर हे गावच्या हद्दीत आहे. कांही वर्षापूर्वी चार गावच्या लोकांनी एकत्र येऊन या मंदिराची उभारणी केली. गावाच्या बाहेर असलेले जूने मंदिर दोन-अडीचशे वर्षापूर्वीचे असावे. मंदिरात देवाचा तांदळा आहे. त्याला चांदीचे डोळे असून, तांदळ्यावर लिंगायतांच्या गळ्यात असते तसले शिवलिंग घातलेले आहे. रविवार हा या ठिकाणचा महत्त्वाचा दिवस समजला जातो. या दैवताला शाकाहारी नैवद्य चालतो, बाहेर असलेल्या दैत्यासुराला मात्र मांसाहार चालतो. या देवतांचा पुजारी धनगर आहे. 'त्याच्या मताप्रमाणे या गावचा विठ्ठल-बिरोबा हा देव पंढरपूरच्या विठ्ठलापेक्षा जुना आहे. या देवाची पूजा धनगरांची आहे मात्र देव वाण्यांचा आहे. पुजाऱ्याच्या म्हणण्यानुसार येथे वीरशैवाचा प्रभाव दिसून येतो.'[२५]

जवळा हे गाव सांगोल्यापासून पाच-सहा किलोमीटर असून तेथून पाच-सहा कि.मी.वर जवळा आणि आगलावेवाडी यांचे लोकदैवत मसोबा देव डोंगरावरचा मसोबा म्हणून लोकप्रिय आहे. ही एक शुद्र देवता आहे. तर काहीना आपले ग्रामदैवत वाटते. तर कांही अभ्यासकांना हा शब्द महिषासुराचा अपभ्रंश असावा असे वाटते. जवळा या गावच्या 'मसोबाची यात्रा जानेवारीत अमावस्येनंतर सुरू होते, ही यात्रा जवळपास पंधरा दिवस चालते. हे जागृत देवस्थान आहे, आठवड्यात दर रविवार, मंगळवार, शुक्रवार पन्नास ते साठ बकरी बळी दिली जातात. जुलै महिन्यात पूर्ण एक महिना दिवसाला एक हजारांच्या जवळपास बकरी बळी जातात' पाणगांव हे बार्शी शहरापासून अतिशय जवळ असलेले छोटेसे गाव आहे.या गावात महादेवाचे प्राचीन मंदिर आहे. हे गावाचे ग्रामदैवत आहे. बार्शी तालुक्यात महादेवाची मंदिरे अनेक ठिकाणी आहेत. सुरुवातीला शैव सांप्रदायाचे वर्चस्व समाजावर असावे असे वाटते. कारण जेंव्हापासून मूर्तीपूजाला प्रारंभ झाला, तेंव्हापासून शिवपूजा केली जात असावी असे वाटते.

बांधावर, गावाच्या शिवेवर या दैवताचे स्थान आहे. गावात रोगराई उत्पन्न झाली की लोक मसोबाला कोंबडी, बकरे किंवा नारळ अर्पण करतात. महाराष्ट्रात काही ठिकाणी तेलाचा घाणा सुरु करण्यापूर्वा मसोबादेवाची स्थापना करतात. यामुळे तेल अधिक निघते अशी लोकांची धारणा असते. मसोबा, साप, भुजंग, नाग यांचे रूप घेऊन शेतीचे रक्षण करतो, अशी शेतकऱ्यांची भावना आहे. शंकर पाटलांनी 'भूजंग' ही कथा यास अनुसरुनच लिहिली आहे.

पितृदैवतांची व्यापकता विचारात घेतल्यास लक्षात येते. सोलापूर जिल्ह्यात भगवान महादेवांची मंदिरे असून मंदिरात लिंगस्थापना फार मोठ्या प्रमाणात आहे, प्राचीन मंदिरे आहेत, त्यांची रचना सुबक, नक्षीदार आणि कौशल्यपूर्ण आहे. प्राचीन काळी वास्तुकलेची भरभराट झाली. त्यात मुख्यतः मंदिरे उभा करण्याचे काम या प्रतिभावंतांनी केले. मंदिरातील मूर्तीकला यातुनच समृध्द झाली. लोकदैवत, कुलदैवत आणि ग्रामदैवत अशा देवदेवता आकाराला आल्या, यातुनच आज अशा दैवतांची पूजा केली

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

जाऊ लागली. सोलापूर या जिल्ह्यात धनगर समाज संखेने अधिक आहे, त्यांच्या बिरोबा या लोकदैवतांची ठाणी सर्वत्र आढळतात. सांगोला, मंगळवेढा, माळशिरस,पंढरपूर आणि अक्कलकोट या ठिकाणी या दैवतांची उपासना फार मोठ्या प्रमाणात केली जाते. मसोबा हे दैवत सामान्य लोकांचे असले तरी त्यांचे उपासक या जिल्ह्यात पुष्कळ आहेत. प्रत्येक शेतकऱ्याच्या बांधावर आणि गावाच्या शिवेवर हे दैवत ठाण मांडून बसले आहे.संबंध शेतकरी,शेतमजूर मसोबाचा भक्त आहे.सोलापूर जिल्ह्यात मसोबा या देवाचे सर्वात मोठे ठिकाण सांगोला जालुक्यात जवळा या गावी आहे.या बरोबरच माढा तालुक्यात रुई, उत्तर सोलापूर तालुक्यात तिऱ्हे, पंढरपूर तालुक्यात कासेगाव या गावी या मसोबा दैवतांची प्रसिध्द अशी ठाणी आहेत.

संदर्भ टीपा-

१ लोकसंस्कृतीची क्षितिजे - ढेरे रा.चिं. प्रथमावृत्ती-१९७१,
२. श्रीविठ्ठलः एक महासमन्वय - ढेरे रा.चिं.
३. लोकधाटी अवलोकन आणि विचार - शिंदे वि.का
४. थिंक वेबसाईड, इंटरनेट - माने मनिषा शैलेष,
५. महाराष्ट्रातील चार दैवते - खरे ग.ह